# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ५९ वा ❑ मंगळवार दि.०८ एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## बलुच बंडखोरांचे वाढते वर्चस्व

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

पाकिस्तानच्या अशांत बलुचिस्तान प्रांतात अलिकडच्या काळात बलुच लिबरेशन आर्मी (बीएलए) या बंडखोर गटाचे हल्ले वाढले आहेत. बीएलए आता पाकिस्तान सरकारला खुले आव्हान देत आहे. पाकिस्तानी सैन्यालाही बलुच बंडखोरांचे हल्ले रोखण्यात अपयश येत असल्याचे दिसून येत आहे. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या बिघडलेल्या परिस्थितीमुळे बलुचिस्तान सरकारने अनेक प्रमुख राष्ट्रीय महामार्गांवर रात्रीच्या प्रवासावर बंदी घातली आहे.

पाकिस्तानातील सर्वात मोठा प्रांत बलुचिस्तान पाकिस्तानच्या गळ्यातील फास बनत चालला आहे. एकीकाळी इस्लामाबादच्या राज्यकर्त्यांची जहागीर मानल्या जाणाऱ्या या प्रांतावर आता बलुच बंडखोरांचे वर्चस्व आहे. पाक सैन्याची पकड सैल होत असून सध्या दहा हजार महिला रस्त्यावर उतरल्या आहेत बलुचिस्तान मध्ये पाकिस्तानी सैन्याची पकड आता राजधानी श्वेता पुरती मर्यादित आहे. बलुच आता बलुचिस्तानच्या रस्त्यांवर राज्य करतात. परिस्थिती अशी आहे की आंतरराष्ट्रीय रेड क्रॉसला या भागात प्रवेश करण्यासाठी बलुच सैनिकांची परवानगी घ्यावी लागते. सीपीईसीमध्ये काम करणाऱ्या चिनी कामगारांना सुरक्षित ठिकाणी पाठवण्यात आले आहे. त्यांना गॉदर सोडू नका असे सांगण्यात आले आहे पाकिस्तानात त्यांना एका प्रांतात बंडाचा सामना करावा लागण्याची ही दुसरी वेळ आहे.

दरम्यान बलुचिस्तान मध्ये मानवाधिकार कार्यकर्ते मेहरंग बलोच यांच्या अटकेचा निषेध करण्यासाठी दहा हजार महिला रस्त्यावर उतरल्या आहेत. बलुच बंडखोरांव्यतिरिक्त मानवाधिकार कार्यकर्ते बहरंग बलोच बलुचिस्तान प्रांतात पाकिस्तानी सैन्य आणि सरकारला आव्हान देत आहेत. बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने या चळवळीला पाठिंबा दिला आहे.

यासोबतच बीएलएला आता सामान्य जनतेचाही पाठिंबा मिळत आहे यामुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे या आंदोलनामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या चळवळीने तरुण आणि महिलांना संघटित केले आहे. याशिवाय पाकिस्तानी सैन्य आणि सरकारच्या कठोर प्रतिक्रियेमुळे बलुचिस्तान मधील परिस्थिती सुधारण्याऐवजी बिघडत चालली आहे.

अलिकडच्या आठवड्यात वाहनांवर अनेक लक्ष्यित हल्ले झाले आहेत, जेव्हा बंदूकधाऱ्यांनी महामार्गांवरील वाहतूक थांबवली आणि प्रवाशांना ओळखल्यानंतर त्यांची हत्या केली. अशा हल्ल्यांमध्ये बलुच दहशतवाद्यांनी पंजाबी प्रांतातील लोकांना लक्ष्य केले आहे.

काची, झोब, ग्वादर, नुश्की आणि मुसाखेल जिल्ह्यांच्या जिल्हा आयुक्तांनी अधिसूचना जारी करून प्रमुख राष्ट्रीय महामार्गांवर संध्याकाळी ६ ते सकाळी ६ वाजेपर्यंत प्रवास करण्यास बंदी घातली. क्वेटा–तफ्तान रोड, लोरालाई–डेरा गाजी खान रोड, सिबी रोड, कोस्टल हायवे आणि झोब–डेरा इस्माईल खान रोडसह अनेक महामार्गांवर ही बंदी लागू आहे.

जवळजवळ दोन दशकांपासून, बलुचिस्तानमध्ये जातीय बलुच अतिरेकी हिंसाचार सुरू आहे, जे पंजाबी–वर्चस्व असलेल्या सशस्त्र दलांवर हल्ले करत आहेत. बीएलएचा आरोप आहे की लष्कर पाकिस्तान सरकारला प्रांतातील खनिजांचे शोषण करण्यास मदत करत आहे. तथापि, अधिकाऱ्यांनी हा आरोप फेटाळून लावला आहे.

अलीकडेच बीएलएने जफर एक्सप्रेस ट्रेनवर हल्ला केला होता. तथापि, बंदी घातलेल्या बलुच लिबरेशन आर्मीच्या अतिरेक्यांनी क्वेटाजवळ जफर एक्सप्रेस ट्रेनवर हल्ला केला होता आणि शेकडो प्रवाशांना ओलीस ठेवले होते. या भयानक हल्ल्यानंतर तीन आठवड्यांनी, बलुचिस्तानमध्ये रात्रीच्या प्रवासावर बंदी घालण्यात आली.

पाकिस्तान सरकारच्या म्हणण्यानुसार, या हल्ल्यात सुरक्षा कर्मचाऱ्यांसह एकूण २६ ओलिसांचा मृत्यू झाला. त्यातच बलुच दहशतवाद्यांनी ग्वादरच्या कलामत भागात कराचीला जाणारी बस थांबवली होती आणि पाच प्रवाशांची हत्या केली होती. पीडितांना जबरदस्तीने बसमधून खाली उतरवून त्यांची हत्या करण्यात आली.

# विनोद ही संकल्पना प्रत्येकाच्या मनात–भाऊ तोरसेकर

## मेनका प्रकाशनच्या खमंग टमंगच्या प्रकाशन सोहळ्यात तोरसेकर, टोकेकर यांची फटकेबाजी

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – विनोद ही संकल्पना प्रत्येकाच्या मनात असते आणि विनोदी लेखन हे प्रत्येकाला सुचत असते. तथापि, पूर्वतयारी करून विनोदी लेखन करता येत नाही, असे मत ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांनी शनिवारी व्यक्त केले. मेनका प्रकाशनने प्रकाशित केलेल्या आणि ज्येष्ठ पत्रकार भगवान दातार लिखित खमंग टमंग या खुमासदार पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल टिळक रोड येथील गणेश सभागृहात शनिवारी (ता. ५) पार पडला. खमंग टमंगचे प्रकाशन तोरसेकर यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार प्रवीण टोकेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मेनका प्रकाशन चे व्यवस्थापकीय संचालक अभय कुलकर्णी व्यासपीठावर उपस्थित होते. भाऊ तोरसेकर म्हणाले, की विनोद गुदगुल्या करणारा असावा, त्यात ओरखडे काढलेले नसावेत.




एखाद्याला डिवचून विनोद करता येत नाही. तुमचा हेतू काय, यावर विनोदाचा अर्थ ठरत असतो. अधिकाराच्या घोड्यावर जबाबदारी बसते तेव्हा ती सांविधानिक होते. माध्यमांमुळे चळवळी संपल्या, कारण अनेक चळवळी या केवळ कॅमेऱ्यापुरत्या उरल्या आहेत, असे वक्तव्य त्यांनी केले. डोळ्यांसमोरच्या बातम्या पत्रकारांना दिसत नाही, फक्त पत्रकार परिषदेतल्या बातम्या सध्याचे पत्रकार करतात, अशी टीकाही त्यांनी एकांगी पत्रकारिता करणाऱ्यांवर केली. प्रवीण टोकेकर म्हणाले, की विनोदात वैर नसते, वैरभाव माणसांमध्ये असतो. विनोद हा दोस्तांच्या कोंडाळ्यात रमणारा असतो. विनोद मैत्री करू शकतो, पण विनोद हे शस्त्र वगैरे नसते. विनोदी लेखन ही एक कसरत असते, त्याला एक मर्यादा आहे, ती आपण पाळली पाहिजे, अपमान करणे हा नवीन प्रकार सध्या विनोदाच्या नावाखाली रुळला आहे, हे सांगताना ते म्हणाले, की स्टँड अप कॉमेडीच्या नावाखाली कुणाल कामराने जे केले त्याला विनोद म्हणता येत नाही. महाराष्ट्र नावाची एक व्यवस्था आहे त्याला कुणाल कामरा विचारत नाही. त्यामुळे कुणाल कामराला विनोदवीर म्हणणे, ही गफलत होत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

खमंग टमंग पुस्तकाचे लेखक भगवान दातार यांनी पुस्तक लिहिण्यामागची भूमिका स्पष्ट केली ते म्हणाले, की सध्याच्या काळात राजकीय दांभिकतेवर भाष्य करण्यासाठी उपहास आणि विडंबन याचा शस्त्र म्हणून वापर करता येतो. या प्रकाराच्या लेखनशैलीचा वापर करीत तत्कालीन राजकीय नेते, प्रसंग आणि घटना यावर भाष्य करणारे लेखन केले, हे सांगताना शरद पवार, उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात यांच्यामुळे लेखनाची प्रेरणा मिळाली, असेही त्यांनी नमूद केले.

अभय कुलकर्णी यांनी भगवान दातार यांनी त्यांचे लिखाण प्रसिद्ध करण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानले. कुणाल कामरा याच्यासारखी राजकीय सुपारी न घेता, प्रामाणिकपणे राजकीय विडंबनात्मक लेखन दातार यांनी केले आहे, असेही त्यांनी नमूद केले. दातार यांचे स्नेही सुधीर मोघे यांनी सूत्रसंचालन केले, केतकी दातार हिने स्मृती वंदना सादर केली.

# प्रगल्भ राष्ट्रवादी विचारवंत आणि प्रख्यात लेखक डॉ. सूर्यकांत बाली यांचे निधन

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे तीव्र शोक व्यक्त

**ज्योतिर्मय साहित्य**

**दिल्ली** – प्रख्यात लेखक डॉ. सूर्यकांत बाली (८२)यांचे आज सकाळी दुःखद निधन झाले. सूर्यकांत बाली यांचा जन्म ९ नोव्हेंबर १९४३ साली मुलतान (आता पाकिस्तान मध्ये) झाला. सूर्यकांत बाली यांच्या लेखनात राष्ट्र आणि राष्ट्रीय प्रश्न स्पष्टपणे दिसत होते. त्यांनी राष्ट्रीय विचाराला नवी किनार दिली. ते दिल्ली विद्यापीठातील रामजस कॉलेजमध्ये शिक्षक होते, नवभारत टाइम्सचे संपादकही होते. यानंतर स्वतंत्र लेखन हा त्यांच्या आयुष्याचा एक भाग राहिला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबाळे यांनी डॉ. बाली यांच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे. आपल्या शोकसंदेशात ते म्हणाले की, प्रख्यात लेखक आणि साहित्यिक डॉ. सूर्यकांत बालीजी यांचे निधन ही दुःखद बातमी आहे. डॉ.सूर्यकांत बाली यांनी आपल्या प्रखर राष्ट्रवादी विचाराने हिंदी साहित्याची जोपासना केली. त्यांच्या कलाकृतींनी साहित्य आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात नवीन प्रकाश टाकला. ते हिंदी आणि संस्कृत भाषांचे उत्तम जाणकार होते. डॉ बाली यांच्या विद्वत्तेला मी आदराने नतमस्तक होतो. त्यांच्या स्मृतीस मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि दिवंगत आत्म्यास दया देवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांच्या कुटुंबियांना आणि मित्रांबद्दल माझ्या मनापासून संवेदना. शोकाकुल कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो. आणि दिवंगत आत्म्याला मोक्ष मिळो ही ईश्वर चरणी प्रार्थना.



सूर्यकांत बाली यांचा जन्म ९ नोव्हेंबर १९४३ रोजी मुलतान (अविभाजित भारत) येथे झाला. हंसराज कॉलेजमधून त्यांनी बीए केले. दिल्ली विद्यापीठातून ऑनर्स (इंग्रजी), एमए (संस्कृत) आणि नंतर संस्कृत भाषाशास्त्रात पीएचडी. च्या पुढे त्यांनी स्वतःला अभ्यास, अध्यापन आणि लेखनाशी जोडले. भारतीय राजकारणाचे महाप्राशन आणि भारताच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख या राजकीय लेखनावर केंद्रित असलेल्या दोन पुस्तकांव्यतिरिक्त, श्री बाली यांची भारतीय पुरातन वास्तूंवरील तीन पुस्तके आहेत – संस्कृत व्याकरणात भट्टोजी दीक्षितांचे योगदान (पीएच. डी. थिसिस), महाद्वीपमधील ऐतिहासिक आणि गंभीर अभ्यास आणि अथर्व या पुस्तकात. महाभारतः पुनर्पथ. त्यांनी प्रथमच वैदिक कथांचे हिंदीत भाषांतर केले.

कादंबरीच्या रूपात सादर झालेल्या, तुम कब आओगे श्यावा आणि दीर्घातमा अशी त्यांची नावे आहेत. नवभारत टाइम्समधील रविवारच्या वार्तामध्ये इंडियाज माईलस्टोन्स हा वाचकांचा सर्वात आवडता स्तंभ होता. ती 'भारतगाथा' या पुस्तकाच्या रूपाने वाचकांपर्यंत पोहोचली.




# "नलिनी" काव्यसंग्रहाचे प्रकाशन थाटात संपन्न

## स्त्रीमनाच्या विविध छटांचा सृजनशील आविष्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – वल्लरी मीडिया प्रस्तुत आणि वल्लरी प्रकाशन यांच्यातर्फे प्रसिद्ध झालेल्या "नलिनी" या प्रतिनिधिक काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा शनिवारी, ५ एप्रिल २०२५ रोजी माधवराव पटवर्धन सभागृह, सदाशिव पेठ, पुणे येथे उत्साहात आणि साहित्यिक वातावरणात पार पडला.

या विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म.भा. चव्हाण हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सुहास घुमरे, राजेंद्र भिडे आणि मानसी चिटणीस यांनी उपस्थित राहून आपले विचार मांडले. सूत्रसंचालन प्रज्ञा कल्याणकर यांनी अत्यंत ओघवत्या शैलीत पार पाडले.

"नलिनी" हा काव्यसंग्रह म्हणजे महाराष्ट्राच्या विविध भागांतील स्त्रीकवयित्रींच्या अनुभवांचा, भावना, संघर्ष आणि स्वप्नांचा कवितारूपी दस्तावेज आहे.

या संग्रहात सहभागी असलेल्या कवयित्री गौरी बागलकोटे (मिरज), नीता चापले (पुणे), पूजा डोंगरे (सातारा), रजनी दुबेदी (पुणे), रेखा थिवरेकर (छ. संभाजीनगर), शुभांगी पुरोहित (पुणे), अनिता तावे (जालना), रंजीता गोवेकर (अमरावती) आणि अलका चिडले (नागपूर). कार्यक्रमाचे निमंत्रक किरण इनामदार, प्रकाश तांबे, ज्योती इनामदार, वीणा कडू आणि माया कल्याणकर हे होते. कविता हा केवळ अभिव्यक्तीचा नाही, तर आतून उलगडणाऱ्या जाणिवांचा प्रवास असतो. 'नलिनी' हा काव्यसंग्रह त्या प्रवासाचा एक हृदयस्पर्शी ठसा उमटवतो. रसिक वाचकांनी आणि साहित्यप्रेमींनी या संग्रहाला भरभरून प्रतिसाद दिला.







– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...

## संस्कृती संस्कारांवर आधारलेली असते

ज्योतिर्मय 📖 साहित्य

संस्कारांशिवाय जीवन भरकटलेल्या जहाजाप्रमाणे, विमानाप्रमाणे असते, एकप्रकारे विमनस्क अवस्थेतील मन कोणतीही पातळी गाठू शकते. आपली संस्कृतीसुद्धा संस्कारांवर आधारित असते. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असे म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्गुण असणे जरुरीचे असते. अशा गुणांचा केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो. विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतेच असे नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचेच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचे दिसून येत असते. ह्याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक असते. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे, असा विचार आपल्या मनात यायला हवा. विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसे मिळेल, ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणे महत्वाचे ठरते. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक, मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा, आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झाले, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचे दर्शन होतच राहते. आपल्या अंतर्मनाला संस्कारच शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचारांची व्याप्ती आपण समजून घेणे सर्वप्रथम जरुरीचे असते. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याशिवाय आपल्या विचारांमध्ये परिपक्वता येतेच असे नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असते. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात. आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो.

## अनोखे अंदमान – भाग १




ज्योतिर्मय 📖 साहित्य

मी लोकसत्ता दैनिकात अंदमान यात्रेची जाहिरात पाहिली पुणे येथील श्री आनंद दवे हे अंदमानला सहल घेऊन जाणार होते. त्यांच्यासोबत आम्ही जाण्याचे ठरवले मी माझी पत्नी सौ श्रद्धा, माझे व्याही श्री आणि सौ दिंडोकार, सौ श्रद्धाची मोठी बहीण श्रीमती जयाताई मैराळ अशा पाच जणांची नाव नोंदणी आम्ही श्री आनंद दवे यांच्याकडे केली. आमच्या सोबत या सहलीमध्ये श्री आनंद दवे यांच्यासह एकूण २९ जणांचा सहभाग होता.

२० फेब्रुवारी २०२५ रोजी आम्ही पुणे येथून आमच्या प्रवासाला सुरुवात केली. आमचा प्रवास रात्रीचाच होता. विमान प्रवास दोन टप्प्यात होता आधी आम्ही चेन्नईला पोहोचणार होतो आणि तिथून दुसऱ्या विमानाने पोर्ट ब्लेअरला. चेन्नई विमानतळावर उतरल्यानंतर आम्हाला काही तास पुढील विमानाची वाट पहावी लागली आणि चेन्नई येथून पहाटे पुढील विमानाने आम्ही पोट ब्लेअरला रवाना झालो.




पोर्ट ब्लेअरला पोहोचेपर्यंत छान उजाडले होते. समुद्रावरून आमचे विमान जात होते. खिडकीतून खाली पाहिल्यानंतर अंदमान बेटांची लांब रांग दिसत होती. सकाळी बरोबर साडेसात वाजता आमचे विमान अंदमानच्या पवित्र भूमीवर उतरले. अंदमानचे विमानतळ छोटे परंतु सुंदर आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर हवाई अड्डा असे या विमानतळाचे नाव आहे आम्ही आमचे सामान घेऊन बाहेर पडलो तर स्वातंत्र्यवीर सावरकरांचा भव्य पुतळा नजरेस पडला. या भूमीवर त्यांच्या झालेल्या या प्रथमदर्शनाने मनाला धन्य वाटले. त्यांना वंदन केले. आम्हाला घेण्यासाठी तेथील प्रेम या नावाचा नियोजित प्रतिनिधी विमानतळावर हजर होता. त्याच्याबरोबर आम्ही हॉटेल ब्ल्यू सी मध्ये पोहोचलो.

आमची बाकीची मंडळी अजून यायची होती. त्यांचे विमान हैदराबादहून येणार होते. ते सकाळी साडेनऊ वाजता पोहोचणार होते. तोपर्यंत आम्ही फ्रेश होऊन चहा नाश्ता घेतला आणि विश्रांती घेतली. दुपारच्या जेवणानंतर तीन वाजता आम्ही अंदमान येथील सेल्युलर जेल ला भेट देण्यासाठी निघालो. ( क्रमशः )



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## पढत मूर्ख लक्षण

ज्योतिर्मय 📖 साहित्य

यासाठी आपणा सर्वांना महिती असलेले कोळी, माशी, हत्ती, कमळ, मुंगीचे ऊदा समर्थ देतात. स्त्रियांच्या संगतीत रमतो, प्रत्येकाला ब्रम्हज्ञान सांगत बसतो, दारू सारख्या निंद पदार्थीचे सेवन करतो. वाईट आचरणाने वागतो. मी म्हणजेच देह अशी खोटी भावना अंगिकारणारा, अती लोभापायी भगवंताशी मैत्री न करणारा, आपमतलबी, स्त्रियांच्या अवयवांचे वर्णन करणारा, त्यांची नाना सोंग घेणारा, भगवंताला विसरून फाजील पणात जगणारा, ऐश्वर्य असेल तर त्याच्या मनामधे घमेंड येते, सर्व जीव मात्रांना विसरतो. त्यांना हीन समजतो, शास्त्रविरोधी मतांचे प्रतिपादन करतो. त्यांना आधार देतो,

जो कोणी विद्वा विरक्त आहेत ब्रम्हज्ञानी आहे, महायोगी हे ऐवढे अधिकार हातात असताना लोकांना खोटे भविष्य सांगत सुटतो. तो पढतमुर्ख होय.समाजाला खंबीर बलशाली कणखर अशा लोकांची गरज असताना, अशी विचारधारा असताना समाजाला सन्मार्गाला लावायचे सोडून नको त्या गोष्टींची पाठराखण करतो,समाजात बेबंदशाही माजवतो तो पढतमुर्ख होय.ज्याने कधीच भक्ती मार्गाचा अवलंब केला नाही .वैराग्य, भजनपूजन न करता लोकांना मात्र ब्रम्हज्ञानसांगतो तो पढतमुर्ख होय. तिर्थक्षेत्र,वेदशास्त्र,भजनपुजन या सर्वांना कर्मठपणा समजून त्याग करतो अपवित्र भ्रष्ट आचरणाने वागतो. ज्याची योग्यता नाही त्याची स्तुती करतो. एखाद्याची तोंडावर स्तुती करायची व पाठ फिरली की त्याच्यावर शिव्यांची लाखोळी वहायची. गुरूंचा अनादर करायचा. ज्ञानाच्या मोठमोठ्या बाता सांगत बसतो दुसऱ्याला चांगले वागण्यास सांगतो पण स्वतः दुष्कर्म करतो. अनाचाराने अवैधरित्या धन संपत्ती जमा करतो. पैसा मिळवण्यासाठी स्वार्थीपणाने परमार्थाचा वापर करतो. स्वतः ब्रम्हज्ञानी नसुनही लोकांना ब्रम्हज्ञान पेरण्याचा खटाटोप करतो. परमार्थाच्या नावाखाली देवाधर्माच्या नावावर जो भ्रष्टाचार, अनाचार,अनागोंदी कारभार करतो.प्रपंच अशाश्वत म्हणून त्याच्याकडे पण नीट लक्ष दिले नाही. परमार्थ खोटा मानला म्हणून तो केला नाही. सतत देवाब्राम्हणांचा द्वेश करून सतत नकारात्मक विचारात गढून जातो तो पढतमुर्ख होय.

समर्थानी ऐकुण ४१ ओव्यामध्ये पढतमुर्खाचे वागणे सांगितले आहे मला समजले तसे प्रत्येक ओवी माझ्या कुवतीनुसार मांडण्याचा प्रयत्न केला .

## भगवंताजवळ नामाचे प्रेमच मागा



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय 📖 साहित्य

भगवंतापाशी मागणे करताना काय मागाल ? तुम्ही त्याच्याजवळ नामाचे प्रेमच मागा; दुसरे काही मागू नका. देवाजवळ मागणे मागताना चूक होऊ नये. एखाद्या शिक्षकाने विद्यार्थ्यांना वर्षभर उत्तम रीतीने शिकविले, परीक्षेच्या वेळी परीक्षक कोणते प्रश्न विचारण्याचा संभव आहे हे सांगून, त्यांची उत्तरेही सांगून ठेवली; पण परीक्षक परीक्षा घ्यायला आला असता प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनीच द्यायची असतात. तिथे शिक्षक हजर असला, आणि विद्यार्थी उत्तर चुकीचे देतो आहे हे जरी त्याला दिसले, तरी तिथे त्याला काही बोलता येत नाही. तशी माझी स्थिती आहे. म्हणून मागणे मागण्याचे काम तुम्हालाच करायचे आहे. तेव्हा त्या वेळी चुकीने काही भलतेच मागू नका, एवढ्याचकरिता हा इशारा आहे.

कोणतीही परिस्थिती असली तरी त्यात भगवंताचे स्मरण ठेवावे, म्हणजे बऱ्यावाईट गोष्टींचा परिणाम मनावर कमी होतो. मनुष्यावर संकटे आली की तो घाबरतो. परंतु परमेश्वराचे अस्तित्व मानणाऱ्यांनी तरी असे करणे योग्य नाही. एखाद्या लहान मुलाच्या बापाने डोक्यावर पांघरूण घेऊन बागुलबुवा केला तर ते मूल भिते; पण पांघरूणाच्या आत आपला बापच आहे असे त्याला समजले की ते घाबरत नाही. त्याप्रमाणे, प्रत्येक व्यक्तीने आपल्या बाबतीत घडणाऱ्या बऱ्यावाईट गोष्टी परमेश्वराच्या किंवा आपल्या गुरूंच्या इच्छेने होतात ही जाणीव ठेवावी. म्हणजे त्याला भीती वा दुःख वाटणार नाही, तसेच चांगल्या गोष्टी घडल्या तरी त्याबाबत आनंदातिरेकही होणार नाही. याकरिता सदासर्वकाळ भगवंताचे चिंतन करावे. आपल्या विचाराने ठरल्याप्रमाणे झाल्याने सुखच मिळते असे नाही. काही वेळेस आपल्या विचाराच्या उलट होऊनही मागाहून तसे झाल्यानेच बरे वाटते. म्हणजे कोणत्याही गोष्टीचे सुखदुःख तात्काळ कळत नाही हेच खरे. म्हणून जरा वेळ थांबून सुख किंवा दुःख मानू या.

कर्ज फिटताना जसा आपल्याला आनंद होतो तसा देहभोग भोगताना आपल्याला आनंद झाला पाहिजे. प्रारब्ध टाळणे म्हणजे लोकांचे कर्ज बुडविणेच होय. आपला म्हणजे 'मी' पणाचा नाश आणि प्रारब्धाचा नाश, बरोबर होतो. ''भगवंता, प्रारब्धाने आलेल्या दुःखाचा दोष तुझ्याकडे नाही. जर त्या दुःखामुळेच तुझे अनुसंधान टिकत असेल तर मला जन्मभर दुःखामध्येच ठेव.'' असे कुंतीने भगवंताजवळ मागितले. यातले मर्म ओळखून वागावे आणि काहीही करून अनुसंधानात राहण्याचा प्रयत्न करावा.

भगवंताला अशी प्रार्थना करावी की, देवा प्रारब्धाने आलेले भोग येऊ देत पण तुझे अनुसंधान मात्र चुकू देऊ नकोस.

***

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## गोष्टी प्राण्यांच्या ६

ज्योतिर्मय 📖 साहित्य

लहानपण खेडेगावात गेल्यामुळे निसर्गाची विविधता अनुभवता आली. त्याचा आनंद घेता आला. आणि कोणत्याच प्राण्यांची कधी भीती वाटली नाही. निसर्गातून एक लक्षात आले होते, प्राणी उगीचच कोणाला इजा करत नाहीत. आपण त्यांना घाबरतो आणि ते आपल्याला घाबरतात. माणूस आणि प्राणी यांच्यातील गैरसमजा मुळे गोंधळ उडतो. आमच्या घरात इतके मोठे बेडूक यायचे की बघून भीती वाटायची. आणि आपण त्यांना हाकलू लागलो की त्यांचा गोंधळ व्हायचा आणि ते अजूनच आत कुठेतरी जाऊन बसायचे. पण त्यांना काहीच केले नाही तर ते निघून जायचे. आम्ही जेव्हा नवीन घरात रहायला आलो त्या वेळी आजुबाजूचा निसर्ग आणि घरासमोरील रिकामी गवत असलेली जागा बघून खूप छान वाटायचे. या घरात रहायला आल्यावर जेव्हा पहिलाच पाऊस पडला त्या वेळची आठवण अजूनही येते. रात्री आम्ही झोपलो त्यावेळी घरासमोर छान हिरवळ होती. रात्री बराच पाऊस पडला. सकाळी उठून बघितले तर समोरची हिरवळ एकदम पिवळी दिसली. सगळ्यांच आश्चर्य वाटले. मग कोणीतरी त्यावर एक छोटा दगड टाकला तर त्या पिवळ्या गवतात हालचाल झाली. म्हणून परत एक दगड टाकला तर त्यातून एक पिवळा धम्मक बेडूक उडी मारून बाहेर पडला. मग समजले, त्या रिकाम्या जागेत पावसाचे पाणी साठले होते. आणि उन्हाळ्यात जे बेडूक दगडांच्या कपारीत आडोशाला बसतात ते सगळे या पाण्यात आले होते. कधीही न बघितलेले हे पिवळे शेत त्या दिवशी बघितले. मग घरातील मोठ्या माणसांनी सांगितले अशा या पावसाला बेडकांचा पाऊस म्हणतात. कारण ते सगळीकडून पाणी असते त्या जागी जमा होतात. विशेष म्हणजे दिवसभरात त्यांनी आपापल्या जागा/ठिकाणे शोधली आणि जसे सगळे अचानक आले, तसेच अचानक गायब झाले.

या घरात आल्यावर अजून एक गोष्ट लक्षात आली. जसे मांजर किंवा कुत्रे कुठेही सोडले तरी पुन्हा आपल्या स्वागताला हजर असतात. तसेच आमच्या घरातील म्हणजे जिन्याखाली बसायचा, तो बेडूक कुठेही नेऊन सोडला की एक दीड तासात पुन्हा येत असे. हे माझे निरीक्षण होते. पण मला घरातील सगळे खोडून काढत होते. मग त्याला दुसरीकडे नेऊन सोडण्यापूर्वी त्याच्या पायात एक दोरा बांधला. आणि त्याची सगळयांना ओळख पटली.

एकदा तर असे दृश्य बघितले होते, की त्यावेळी संमोहन याचा अर्थ कळला होता. पूर्वी सांडपाणी वाहून नेण्यासाठी उघडे अर्धे पाईप असायचे. त्यातून एकदा एक साप त्वरेने चालला होता. तो कुठे चालला आहे हे बघितले तर त्याच्या समोरच्या दिशेने बेडूक येत होता. आणि त्याला पकडण्यासाठी साप चालला होता. आम्हा बघणाऱ्यांना हे कळत नव्हते की बेडूक त्याच्याच दिशेने का चालला आहे? दोघेही जणू एकमेकांना भेटायला निघाले होते. बेडकाच्या जवळ आल्यावर सापाने तोंड उघडले आणि बेडूक हळूहळू चालत त्याच्या तोंडांत गेला. तो अर्धा तोंडांत असताना साप पटकन वळाला आणि झटक्यात निघून गेला.

खरे तर आपणच त्यांच्या घरात रहायला येतो. आणि त्या घरावर मालकी हक्क गाजवतो. मग या प्राण्यांनी कुठे जावे? एक पाऊस पडला की छोटे छोटे बेडूक घरात यायचे. दार लावले तरी त्याच्या खालच्या बाजूने हळूहळू सरकत यायचे. आणि गुपचुप लपून बसायचे. त्यांना बाहेर काढण्यासाठी दिवसातून किमान दोन वेळा तरी फरशीवर पाणी ओतावे लागायचे.त्या नंतर ही पिल्ले बाहेर पडायची.

आता हे कुठेच दिसत नाहीत. सगळी जागा सिमेंटच्या घरांनी व्यापली आहे. खरे तर हे सगळे निसर्ग साखळीचा महत्वाचा भाग असतात. तेच नष्ट होत चालले आहेत. अशाच छोट्या छोट्या गोष्टी निसर्गाचा समतोल बिघडवण्यासाठी कारण असतात.

अशाच काही प्राण्यांच्या गोष्टी पुढच्या भागात बघू.



नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**लोभश्चेदगुणेन किं पिशुनता यद्यस्ति किं पातकैः**
**सत्यं चेत्तपसा च किं शुचि मनो यद्यस्ति तीर्थेन किम्।**
**सौजन्यं यदि किं गुणैः सुमहिमा यद्यस्ति किं मण्डनैः**
**सद्विद्या यदि किं धनैरपयशो यद्यस्ति किं मृत्यूना।।**

अर्थ – माणसाला लोभ असेल, तर अन्य दुर्गुण कशास हवा? कलह लावण्याची वृत्ती आहे, तर अन्य पापाची काय आवश्यकता? सत्य आहे, तर अन्य तप कशास हवे? मनाची विशुद्धता आहे, तर तीर्थाची काय आवश्यकता? सौजन्य असेल, तर अन्य गुणांची काय आवश्यकता? व्यापकता आहे, तर कोणत्या अलंकाराची काय आवश्यकता? चांगले शिक्षण आहे, तर धनाची काय आवश्यकता? तसेच अपकीर्ती असेल, तर मृत्यूची काय आवश्यकता?

या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी माणसाच्या गुण-दोषांची चर्चा केली आहे. ते म्हणतात की, लोभ हा मोठा दुर्गुण आहे. कलह लावण्याची वृत्ती पाप आहे. सत्य हेच तप आहे. मनाची विशुद्धता ही तीर्थासमान आहे. सौजन्य हा सद्गुण आहे. व्यापकता हा एक उत्तम अलंकार आहे. चांगले शिक्षण हेच धन होय. अपकीर्ती ही मृत्युसमान आहे.




## पाणी आणि आपले आरोग्य

ज्योतिर्मय 📖 साहित्य

पाणी म्हणजे जीवन मानलं जातं. शरीराला अत्यंत आवश्यक असा हा घटक आहे. मात्र गरज नसताना पाणी प्यायल्यामुळे किंवा चुकीच्या वेळेस पाणी प्यायल्याने त्याचा उपयोग होण्याऐवजी दुष्परिणाम होण्याची शक्यता जास्त असते. म्हणूनच पाणी पिताना काही गोष्टींची, विशेषत: पाणी कधी पिऊ नये याची खबरदारी घेणं गरजेचं आहे.

निरोगी जीवनासाठी योग्य आहारविहाराच्या बरोबरीने, योग्य प्रमाणात पाणी पिणंही आवश्यक असतं. मात्र बरेचजण एक चूक अगदी सर्रास करताना दिसतात आणि ती म्हणजे, अमूक लिटर, अमूक इतके ग्लास पाणी दिवसभरात संपवलंच पाहिजे हा विचित्र नियम पाळणं.

शिवाय हा नियम पाळताना चुकीच्या वेळात पाणी पितच रहाणं सुद्धा अपायकारक आहे. पाणी शरीरासाठी अत्यंत आवश्यक आहेच. मात्र ते पिताना काही गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. किती पाणी प्यावं याचबरोबर ते कधी प्यावं हेदेखील लक्षात घ्यायला हवं.

आपलं शरीर म्हणजे एक चमत्कारिक यंत्रच आहे. त्याच्या गरजा ते योग्यवेळी व्यक्त करतं आणि तितकीच ती भागवतंही. भूक लागल्याशिवाय जेवू नये आणि तहान लागल्याशिवाय पाणी पिऊ नये. अनेकजण उगाचंच तहान लागलेली नसली तरीही सतत पाणी पितच राहतात. हे शरीराच्या रचनेविरूध्द आहे. मात्र याचा अर्थ असा नाही की घशाला कोरड पडेपर्यंत वाट बघावी.

चुकीच्या वेळी पाणी पिणं आणि पाण्याच्या अतीसेवनानं शरीरातल्या मिठाचं अर्थात सोडीयमचं संतुलन बिघडतं. याला असं म्हणतात. यामुळे कधी कधी गंभीर समस्या उद्भवू शकतात.

**झोपण्यापूर्वी**

अनेकांना झोपण्यापूर्वी पाणी, ग्रीन टी, चहा, कॉफी असं काहीतरी पिण्याची सवय असते. मात्र झोपण्यापूर्वी किमान अर्धा तास तरी पोटात कुठलाही द्रवपदार्थ जाऊ देऊ नये. झोपण्यापूर्वी पाणी प्यायल्यानं झोपेत व्यत्यय येतो. जास्त वेळा लघवीला जाण्याच्या शक्यता निर्माण होतात. म्हणूनच झोपण्यापूर्वी अर्धा तास पोट रिकामं असावं. यामुळे झोपही शांत लागते. दिवसाच्या तुलनेत रात्री आपल्या किडण्या मंदपणे काम करत असतात. याच कारणामुळे सकाळी उठल्यावर बरेचदा चेहरा सुजलेला दिसतो. त्यात जर झोपण्यापूर्वी पाणी प्यायलं तर ही सूज वाढण्याची शक्यता असते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

**व्यायाम करत असताना**

तज्ज्ञांच्यामते व्यायामाच्या दरम्यान पाणी प्यायल्यानं त्याचे दुष्परिणाम होण्याची शक्यता बळावते. व्यायाम करत असताना शरीराचं तापमान वाढलेलं असतं. यावेळेस जर थंड पाणी जास्त प्रमाणात प्यायलं तर ची शक्यता असते. याची लक्षणं म्हणजे, डोकं दुखणे, मळमळ, थकवा जाणवणे. शक्यतो व्यायाम झाल्यावरच पाणी प्यावे आणि व्यायामा दरम्यान तहान लागलीच तर दरम्यान भरपूर पाणी न पिता घोट घोट पाणी प्यावे.

**लघवीला रंग नसेल तर–** आपण योग्य प्रमाणात पाणी पित आहोत की नाही? याची सोपी टेस्ट म्हणजे, लघवीचा रंग तपासणे. जर तो फिका पिवळट असेल तर आपण योग्य प्रमाणात पाणी पित आहोत. जर लघवीला रंगच नसेल आणि ती पाण्यासारखीच पारदर्शक असेल, तर मात्र पाण्याचं अतिरिक्त सेवन होत आहे. अर्थात हे सातत्याने होणं योग्य नाही. असं होत असेल, तर पाणी कमी प्यावं. पाण्याच्या अतिसेवनामुळे सोडियमची कमतरता जाणवू लागते आणि कधी कधी हृदविकाराचा झटका येण्याची शक्यताही असते.

अनेकांचा असा समज असतो की सकाळी उठल्यावर अनुशापोटी म्हणजे पोट रिकामं असताना भरपूर पाणी प्यावं. हे अगदी चूक आहे. रिकाम्या पोटी जास्तीत जास्त एक लिटरपर्यंत पाणी प्यावं. अनुशापोटी पाणी पिणं लाभकारक असलं तरीही लिटरच्या लिटर पाणी पिणं असा त्याचा अर्थ नाही. तसेच गार पाण्याऐवजी कोमट पाणी प्यायलं तर आरोग्याच्या दृष्टिनं ते जास्त लाभकारक ठरेल.




ज्योतिर्मय 📖 साहित्य

घराचे मंदिर करायचे असेल तर रामायण वाचा. घरातील व्यक्ती बद्दल विश्वास, प्रेम हवे, सात्विकता हवी. मिथिलाच्या प्रत्येक राजास जनक म्हणत. इथे ४२००० जनक झाले. ते सारे जीवन्मुक्त झाले होते. काय नगरी असेल पाहा ! दशरथाच्या ३ राण्या व चौथी मंथरा या चार प्रकारच्या बुद्धी आहेत कौसल्या सद्बुद्धी, सुनीता शुद्ध बुद्धी, कैकयी कुबुद्धि तर मंथरा दुर्बुद्धी होती. रामा सारखे वागावे रावणा सारखे वागू नये हे कळणे, साठी रामायण वाचावे. एक गुण आपण मिळविला तर दुसरा आपोआप येत नाही पण आपण एक गुण घालवला की त्या सोबत अणेक गुण वजा होतात. आणि एक दोष आला की बाकी अनेक दोष आपोआप येतात. गुण येताना एकटे येतात पण जाताना समूहाने जातात. दोष, दुर्गुण येताना समूहाने तर जाताना एक एकटे जातात. रामायण ऐकण्याचे मात्र अनेक गुण एकदम येतात व दोष एकदम जातात म्हणून रामायण वाचा. वाल्मिकी रामायण का सांगायचे? तर आपण इतर रामायण नेहमी ऐकत असतो. भावार्थ रामायण खूप गोड आहे, विस्तीर्ण आहे माणूस त्यात अडकून पडतो. विचित्र रामायणात सीता ही रावणाची मुलगी आहे हे लिहीले आहे.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

सर्व रामायणे यांचे मूळ वाल्मिकी रामायण आहे. वाल्मिकी रामायण हे चमत्काराला स्थान देत नाही. ते तर्क शुद्ध आहे. येथे दगडाची बाई झाली, सेतू राम नाम लिहून पूर्ण केला हे येत नाही. वाल्मीक हे कोळी नव्हेत तर पूर्व जन्मी प्रचेतसाचे पुत्र होते. चूक संगतीत ते वाढले, मासे मारणे ते माणसे मारणे हे घडत गेले.

क्रमशः

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

पण या सगळ्या कालावधीत छोट्या चारुशीचे मन मात्र तो जिंकू शकत नाही. आपल्या आईवडिलांसह सगळे लोक या तारापदवर प्रेम करू लागल्यामुळे चारुशीचा जळफळाट होतो आणि ती त्याचा द्वेष करू लागते. पण काही क्षण असे येतात की नकळत का होईना मनाच्या एका कोपऱ्यात कुठेतरी तिला त्याच्याबद्दल ओढ वाटते. या सगळ्या संमिश्र आणि गुंतागुंतीच्या भावना आहेत. जमीनदार आपल्या लाडक्या मुलीचे म्हणजे चारुशीचे लग्न तारापदशी करायचे ठरवतात. पण मनमौजी असणारा आणि कुठेही अडकून न पडणारा तारापद तेथून गुपचूप पळ काढतो. तो अतिथी बनूनच राहतो.

या कथेत रवींद्रनाथांनी सगळ्या पात्रांच्या मानवी स्वभावाचे विविध रंग दाखवले आहेत. पित्याचे हृदय असलेला आणि तारापदवर पित्याप्रमाणे प्रेम करणारा जमीनदार मतीलाल, तारापदवर मुलासारखी माया करणारी आई अन्नपूर्णा, हट्टी, दुराग्रही आणि द्वेष करणारी पण मनातून चांगली असलेली चारूशी. सगळ्यात लक्षात राहतो तो तारापद. तो सगळ्यात असूनही कशातही लिप्त होत नाही. रवींद्रनाथ त्याला गढूळ पाण्यात पोहणाऱ्या पांढऱ्या शुभ्र पंखाच्या राजहंसाची उपमा देतात. त्याने जग पाहिले आहे, अनेक लोकांना तो भेटला आहे. पण त्याने त्यांच्यातील सद्गुण तेवढे घेतले आहेत. वाईट गुणांपासून तो कोसो दूर आहे. एक प्रकारे हा मुलगा म्हणजे रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब आहे असे म्हटले जाते. कारण त्यांचे निसर्गाबद्दलचे प्रेम, संगीत आणि कलागुणांची आवड, त्याचप्रमाणे सगळ्यात राहूनही सगळ्यांपेक्षा वेगळा अशा गुणांचे सुरेख मिश्रण असलेला हा तारापद आहे. रवींद्रनाथांच्या आणखी काही कथांबद्दल पुढील भागात जाणून घेऊ या.



## जात्यावरच्या ओव्या......

### नातेसंबंध - मायलेकी

बापाने दिली लेक
नाही पाहिलं वतन
कसायाच्या दारी
गाय बांधली रतन ||१७||

लेकीच्या मायला
काही केल्या करमेना,
पोतारल्या भिंती
वर काढल्या मैना ||१८||

संदर्भ : कै. गवणाबाई बोराडे
संकलन : सौ मनोरमा बोराडे

# स्वप्नपूर्तीचा प्रवास-अभिनेत्री डॉ.जुई जवादे

ज्योतिर्मय साहित्य

**भारतीय संविधानाची सखोल माहिती देणारा अनिल कुमार जवादे आणि निलेश ओंकार निर्मित सचिन उराडे लिखित आणि दिग्दर्शित २६ नोव्हेंबर हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होत आहे.या चित्रपटात डॉ.जुई जवादे ही नवोदित अभिनेत्री पदार्पण करत असून तिचा आजवरचा प्रवास प्रेरणादायी आहे.तिच्या कारकिर्दीवर टाकलेला हा दृष्टीक्षेप...**

**प्रश्न- तुमचा शैक्षणिक प्रवास कसा होता?**

डॉ.जुई - शरद पवार डेंटल कॉलेज, सावंगी येथून मी बीडीएस केलं आहे. व्हीएसपीएम डेंटल कॉलेज, नागपूर येथे इंटरशीप केले आहे. त्यानंतर दोन अनुभवी दंतचिकित्सकांच्या क्लिनिकमध्ये वर्षभर प्रॅक्टिस केली. संचेती हेल्थकेअर अकादमी, पुणे येथून हॉस्पिटल मॅनेजमेंटमधील पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा पूर्ण करून त्यानंतर एमडी इंडिया, पुणे येथे सीनियर एक्झिक्युटिव्ह म्हणून काम केलं आहे. तसेच एका नव्याने सुरू झालेल्या मुंबईतील स्टार्टअपसोबत वर्षभर एन ए बी एच कन्सल्टंट म्हणून अनुभव घेतला आहे.

**प्रश्न- या प्रवासात स्वतःला मागू वळून बघतांना काय वाटते?**

डॉ.जुई- मागे वळून पाहतांना ''मी ज्या वाटेवर आहे ती खरी आहे का?'' हे तपासणं मला जास्त आवडतं. डेंटिस्ट म्हणून मी क्लिनिकल प्रॅक्टिसमध्ये उत्तम कामगिरी केली, पण तरीही असं वाटायचं की काहीतरी चुकतंय, काहीतरी कमी आहे. अनवधानाने वैद्यकीय क्षेत्रात काही गोष्टी घडत गेल्या, आणि मी स्वतःला पटवून दिलं की आयुष्यभर हेच करायचं आहे.पण माझे डोळे दिवस-रात्र एकच स्वप्न पाहू लागले. लहानपणात जे स्वप्नं पाहिलं होतं. एक जीवन आहे, जिथे मी झगमगतेय, जणू एखादी कलाकार आहे, आणि दुसरं जीवन जिथे मी एक प्रोफेशनल डॉक्टर आहे, समाजमान्य मार्गावर चालणारी. मग परत एकदा मागे वळून पाहिलं आणि २०२० मध्ये बदल घडला. एक सुंदर वळण आयुष्यात आलं, आणि मी जशी स्वप्नं पाहत होते, तशीच स्वतंत्र जीवनशैली जगायला सुरुवात केली. ज्यात मीच स्वतःला नव्याने शोधायला लागले होते. हळूहळू मी स्वतःला ऐकायला लागले होते. शांतपणे मी मला हवं ते करत केले आणि त्यातूनच मला माझ्यातील कलाकाराचा शोध लागला.

**प्रश्न - डॉक्टर ते अभिनेत्री हा प्रवास कसा होता?**

डॉ.जुई- हा प्रवास खुपकाही शिकवणारा होता. हा मार्ग कठीण, टीका करणारा, मेहनतीचा आणि धैर्याचा होता. तो मार्ग मी स्वीकारला, कारण तो मला माझ्या खरी ओळखीपर्यंत घेऊन जाणारा होता.स्वतः वर प्रेम करत आणि स्वतःचा विकास यांचं महत्त्व समजलं, आणि त्या प्रक्रियेत मी स्वतःच्या कलेच्या प्रेमात पडले.सर्व जुनं विसरून नव्याने गोष्टी शिकले. एकच जीवन आहे. ते माझ्या पद्धतीने मी जगायला लागले.यातूनच मला एक स्वतंत्र अनुभव मिळाला.

**प्रश्न- तुमच्या लहानपणाची एखादी आठवण सांगा?**

डॉ.जुई- "Wizards of Waverly Place", "Hannah Montana" सारखे डिस्ने शो लहानपणी मी बघायचे. त्यातील अभिनय, डान्स, गाणी याने माझ्या मनावर खोल परिणाम झाला.मी रोज आरशासमोर सगळं बघून अभिनय करत बसायचे. जणू मी त्या आरशाच्या प्रेमातच पडले होते. तेव्हा मला कळले,माझा आवडती गोष्ट म्हणजे परफॉर्म करणे आणि त्यातून मला मिळणारा आनंद ग्रेट असायचा.

**प्रश्न- अभिनेत्री होण्याचा प्रवास कसा सुरू झाला?**

डॉ.जुई- २०२१ मध्ये मी जर्नालिंग सुरू केले आणि सहज लिहिलं,मी एक अभिनेत्री आहे. लोक मला ओळखू लागलेत, माझं काम लोकांपर्यंत पोहोचतंय. हे लिहून मला शांतता मिळाली.मी स्वतः वर संपूर्ण लक्ष केंद्रित केलं.धावणं, मेडिटेशन, स्वतःशी संवाद, वाचन, काम करणं, अभिनयाचा सराव, आणि प्रत्येक क्षणात स्वतःला त्या स्वप्नांमध्ये बघणं असं तीन वर्षं सातत्यानं काम केलं आणि आता अभिमानाने सांगू शकते.जेव्हा माझ्याकडे चित्रपटाची संधी आली त्यावेळी मी पूर्णपणे तयार होते.

**प्रश्न-२६ नोव्हेंबर चित्रपटात अभिनेत्री म्हणून मुख्य भूमिका कशी मिळाली?**

डॉ.जुई- मला 'नैना' नावाचं स्क्रिप्ट मिळालं.त्यात नकारात्मक भूमिका होती म्हणून मी आधी नकार दिला कारण त्यावेळी माझ्यात आत्मविश्वास नव्हता. पण कुटुंबाने समजावलं ''एकदा तरी प्रयत्न कर!'' मी छोटासा सराव सुरू केला, आणि डायरेक्ट कॅमेऱ्यासमोर अभिनय केला.तेथून माझा अभिनय प्रवास सुरु झाला. त्यानंतर मला २६ नोव्हेंबर या चित्रपटात मुख्य भूमिका साकारायला मिळाली,हे मी माझे भाग्य समजते.माझं स्वप्न सत्यात उतरलं होतं.









मुलाखत लेख-
आशिष निनगुरकर, मुंबई

**प्रश्न-तुमचे छंद कोणते? तसेच सोशल मीडिया बद्दल तुमचे मत काय आहे?**

डॉ.जुई- "The Legit Talks" या माझ्या पहिल्या टॉक शोची मी संस्थापक आणि होस्ट म्हणून २०२१ पासून काम करतेय. ''The Legit'' हे मॅगझिन देखील तयार होत आहे. जेव्हा मला सुचू लागते तेव्हा मी मनापासून लिहिते. नुकतीच मी एका मध्ये देखील सहभाग घेतला.

हेल्थ आणि फिटनेस ट्रेनर या माझ्या दुसऱ्या स्टार्टअपद्वारे मी गेल्या ४ वर्षांपासून कार्यरत आहे. अभिनयाबरोबर हेच माझे आवडते छंद आहेत. मी सोशल मीडियावर सक्रिय नसले तरी अनेक क्लायंट्सना इतर माध्यमांतून मार्गदर्शन करते. गेल्या दोन वर्षांपासून मी तरुणांना टॉक शो च्या माध्यमातून योग्य संधी शोधून देण्याचं काम करते. जे तरुण आपल्या आयुष्यात काय करायचं आहे हे शोधत आहेत, त्यांना योग्य मार्ग मिळावा हाच त्यामागे प्रामाणिक उद्देश आहे. मला प्राण्यांची विशेष आवड आहे. प्राणी कल्याणासाठी वेळ, मन आणि मदत करण्याची माझी तयारी आहे.

**प्रश्न- २६ नोव्हेंबर चित्रपटातून नेमके काय सांगितले आहे?**

डॉ.जुई- अनिल कुमार जवादे आणि निलेश ओंकार निर्मित सचिन उराडे लिखित आणि दिग्दर्शित २६ नोव्हेंबर हा घटनात्मक हक्कांची जाणीव करून देणारा महत्त्वाचा चित्रपट आहे.केवळ चित्रपट नसून, एक चळवळ आहे. या चित्रपटात माझ्यासोबत अनिकेत विश्वासराव, सयाजी शिंदे, विजय पाटकर, गणेश यादव, मुश्ताक खान, भारत गणेशपुरे, किशोर चौगुले, डॉ. विलास उजवणे आणि अंजली उजवणे यांसारखे प्रतिभावान कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. हा चित्रपट प्रेक्षकांना केवळ भावनिक करणार नाही, तर त्यांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्याची नवी प्रेरणा देईल. संविधान दिन १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीप्रमाणे मोठ्या प्रमाणावर साजरा व्हावा, हीच आमची इच्छा आहे.हा सिनेमा नागरिकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देण्यासाठी उभा राहिलेला एक प्रेरणादायी आवाज आहे.लवकरच हा माझा महत्वपूर्ण भूमिका केलेला चित्रपट प्रदर्शित होत आहे.

# इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेजच्या कार्यकारी संचालकपदी संजयकुमार जोशी

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर-** गेली तीन दशकं आयटी क्षेत्रात कार्यरत असलेल्या आणि शैक्षणिक गुणवत्ता व कौशल्य विकास यात देशातील विविध संस्थांसाठी योजना राबविणाऱ्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज या प्रतिथयश सॉफ्टवेअर कंपनीच्या एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर पदावर जेष्ठ पत्रकार संजयकुमार जोशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश छडवेलकर यांनी जोशी यांना पदाची सूत्रे सोपविली.

संस्थेचे मुख्य कार्यालय पुण्यातील औंधमध्ये आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीसह केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिलेल्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्रपणे सॉफ्टवेअर निर्मिती करण्यात येत आहे. राज्यासह देशातील विविध शिक्षण संस्था, विद्यापीठ आणि खासगी क्षेत्रातील दिग्गज व्यवस्थापन या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण ज्ञान प्राप्त करण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. आजच्या घडीला सुमारे ११०० हून अधिक संस्था इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज या संस्थेचे सॉफ्टवेअर दैनंदिन व्यवहारात वापरतात. त्यामुळे या शैक्षणिक संस्थांचा निर्णय प्रक्रियेत गुणवत्ता व कौशल्य विकास प्रक्रियेत आमूलाग्र बदल घडवून आणला आहे.

जोशी यांना नामांकित वृत्तपत्रांचा प्रदीर्घ अनुभव आहे. भारतीय मानक ब्युरो, मिटकॉन, स्टार इन्शुरन्स, एलआयसी, अॅम्वे आदी सोबत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. एक्सट्रिम मीडिया हाऊस अंतर्गत वेबपोर्टल व युट्यूब चॅनलचे ते संस्थापक म्हणून कार्यरत आहेत. एक कुशल प्रशासक, व्यवस्थापन, व्यावहारिक विपणन, जनसंपर्क तज्ज्ञ म्हणून ते कार्यरत आहेत. त्यांच्या विविधांगी प्रदीर्घ अशा प्रत्यक्ष अनुभवाचा फायदा नवीन शैक्षणिक धोरण राबविताना होईल असा विश्वास वाटतो, असे संस्थेचे संचालक सचिन नालापुरे म्हणाले.



# भावभावनांचे मिश्रण आयुष्य वेचताना

ज्योतिर्मय साहित्य

स्त्रीला फक्त आसरा हवा असतो. घरात तिचा कचराच होतो. तिला काहीच भाव नसतो. तिचा सर्वत्र छळ सुरू असतो. अशा शब्दांत कवयित्रीने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. विविध भाव भावनांचे मिश्रण असलेला हा कवितासंग्रह आहे. स्त्री रक्षण या कवितेत तिने आपले मन मोकळे केले आहे. स्त्रियांच्या मनातील दुःखाचा हा हुंकार आहे.

कास धरी सत्कर्माची मध्ये ती परोपकार हीच भक्ती दुसऱ्यांच्या आयुष्यात काटे पेरू नका. मनात भाव नसेल तर ती भक्ती काय कामाची असा सवाल ती करते. मोत्यांचे भांडार या कवितेत पश्चातापदग्ध स्त्रीचे मनोगत आहे. वेद पुराणांचे तेथ जडजवाहर संत वचनांच्या मोत्याचे भांडार असे सांगत तिने माणसाच्या हावऱ्या स्वभावाचे वर्णन केले आहे. धरणीमाते या कवितेत शेतकऱ्याचे मनोगत आहे. कर्ज ही कविता भीक नाही मागणार पगारातून मोडून घ्या पण घर बांधणीसाठी कर्ज द्या अशी विनवणी तो सावकाराला करतो.

स्त्रीचं रुजणे अंगणातल्या तुळशीसारखे समर्पित असते. ती कुणासाठीही हसते. तर प्रसंगी लढते आणि तस्लिमानसरीन सारखी पेटूनही उठते. तिच्या मनात कुठलाही मोह नाही. ती सतत दुसऱ्यासाठीच जगते, असं कवयित्री म्हणते. रक्तदान या कवितेत रक्तदानेचे महत्व ती सांगते.

एकलेपण ही कविता आत्मपर आहे. आणि कधी वाटतं या कविता मनोरथाच्या वाटतात. बायकांचा जन्म मध्ये स्त्रियांच्या स्वभावाचे वर्णन आहे.बरं वाईट त्या लगेच विसरून जातात. मुंगी होऊन दाण्यातही आनंद शोधतात. बायकांचं जीवन कष्टातच जातं अखेर एका दिवशी तिला वाटते नको ही रांधा वाढा उष्टी काढा, असा सार्वत्रिक विश्वास ती व्यक्त करते. सुट्टीत कामवाल्या बाईची व्यथा आहे. कुठंही गेलं तरी तिला विश्रांती ही मिळतच नसते. असं तिचं दुःख सनातन आहे. सततचं दुखणं आहे ते.





राक्षस या कवितेत ती समाजातील दुष्प्रवृत्तीचे दर्शन घडवते. आजही समाजात असुर आहेत ते वेगवेगळी रूपे धारण करून वावरत आहेत. कोणताही देव अथवा देवी आता धावून यायची नाही तर स्त्रीनेच स्वतःतील देवांना आवाहन करून जागवायला हवे, ही वस्तुस्थिती ती मांडते.

मौन ही कविता संसारातील वादावर जीभ चावून आपणच किती खंत व्यक्त करायची त्यापैक्षा मौनच राहिलेले बरे असा सल्ला कवयित्री देते. जोकराचं पान मध्ये त्याला किता मान असतो. अपयश त्याच्या गावीही नसते. हुकुमाची उतारी प्रत्येकाला हवी असते. जोकराच्या पानाची व्यथा कुणाला कळेल का,

हिशोब कवितेत ती म्हणते एखाद दिवस तरी उपकार करीत जावे, प्रत्येक दिवशी नफ्या तोट्याचा विचार का करावा. भक्तीच्या खात्यातही आपल्याला नेहमी तोटाच दिसतो.

आईविना मुलांची व्यथा ती नसताना माझी आई या कवितेत मांडते. आपली आबाळ झाली नाही तरी आईची उणीव कायम राहिली. भाकरी या कवितेत ती भाकरीसारखी तव्यावर तापते आहे. तरीही ती स्वप्न पाहते आहे. तव्यावरच्या गरगरीत भाकरीसारखे. पाणी ही भावकविता आहे. वळण ही गेय कविता आहे. जीवनातील वेगवेगळ्या वळणाची. गाठोडे ही देखील भावकविता आहे. स्त्रीत्वाचे देणे व आठवणी या कविता हळव्या आहेत. ती ऑनलाईन असते या कवितेत सध्याच्या जमान्यातील स्त्री तिने रेखाटली आहे. ती फेसबुक, व्हाट्सप बघते तरीही तिच्या नशिबी मुलांसाठी जागणे आहेच. ती सतत कामात असते. तिचा प्रियकर दिवा असला तरी ती चांदणी होऊन अंधार दूर करते.

सर्वच कवितांतून स्त्रीविषयक भाव भावना ती मांडत जाते. कधी त्या संसारी स्त्रीच्या असतात तर कधी सर्वसामान्य स्त्रीच्या असतात. तरीही ती संसारापासून पलायन करीत नाही. समर्थपणे संसार पेलते. कुरकुरी आहेतच त्या पार करून ती जगते आहे. ती आयुष्य जगत नाही तर त्यात सुखदुःख आणि आनंदही वेचत राहते. एका प्रापंचिक स्त्रीचं सनातन दुःख ती मांडताना दिसते. मुखपृष्ठातही ती फुले वेचताना दिसते.

**पुस्तक परीक्षण**

प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
९०११०८२२९९

आयुष्य वेचताना
भावना दातार
मूल्य १२५ रुपये पृष्ठे ७२
प्रकाशक - अक्षरदीप प्रकाशन

# जुन्या पेंशनसाठी शिक्षक शिष्टमंडळ भेटले शिक्षणमंत्री दादा भुसेंचा सकारात्मक प्रतिसाद

ज्योतिर्मय साहित्य

**बीड -** येथील मंत्री दादा भुसे यांच्या निवासस्थानी जुन्या पेंशनसाठी शिक्षक शिष्टमंडळ जाऊन भेटले असता मंत्री महोदयानी सकारात्मक प्रतिसाद दिला. व लवकरच त्यावर निर्णय घेऊ असे शिष्टमंडळाला सांगितले.

ज्या शिक्षकांची जाहिरात ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वीची आहे परंतु नियुक्ती नंतरची आहे. अशा सर्व जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू झाली आहे. परंतु जे शिक्षक खाजगी आस्थापनेवर आहेत अशा शिक्षकांसाठी अद्याप सरकारने आदेश निर्गमित केलेला नाही. तो आदेश शालेय शिक्षण व क्रीडा मंडळ या विभागानी लवकरात लवकर निर्गमित करावा यासाठी शिक्षकांच्या शिष्टमंडळाने मंत्री दादा भुसे यांना भेटले घेतली असता त्यांनी यावर लवकरच निर्णय घेऊ असे शिष्टमंडळाला आश्वासित केले.



०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी जाहिरात आलेल्या व ०१ नोव्हेंबर ,२००५ रोजी किंवा नंतर नियुक्त झालेल्या सरकारी कर्मचारी व प्राथमिक शिक्षकांना जुनी पेन्शन दिली गेली मात्र १००% खाजगी व्यवस्थापनाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकाना लागू केलेली नाही. असे महाराष्ट्रात फक्त १५० शिक्षक आहे.

त्यासंबंधीची फाईल शिक्षण विभागाकडे पाठवून तुमचा प्रश्न मार्गी लावू असे सांगून संबंधित विभागाला तशा प्रकारच्या सूचना दिल्या. या शिष्टमंडळात प्रकाश गायकवाड सानप व राठोड शिवाजी गायकवाड यां सहित अनेक शिक्षक बांधव उपस्थित होते.

# गर्दित हरवलेल्या सावल्या.....

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

दुपारी वामकुक्षी नंतर उठले. आणि मोबाईलचे मेसेजेस रिप्लाय देता देता सहज बाल्कनी मध्ये आले. विसावलेल्या त्या निवांत वेळी अपार्टमेंटच्या सभोवतालच्या परिसरातील झाडांची ती सळसळणारी पाने आणि उत्कंठा वाढविणाऱ्या त्या दूरवर विसावलेल्या सावल्या नकळत खूप काही सांगत होत्या. आणि त्यामध्ये पडलेला तो उन्हाचा चिव चिवचिवता कवडसा आठवणींची गुपिते खोलत होता. बाल्कनी मध्ये पडलेले ऊन अन् हलकेच हलणाऱ्या त्या कपड्यांच्या सावल्या म्हणजे उत्कंठेची अपूर्वाईच जणू. अन् तिचं अपूर्वाई अलगद स्मरण वाटेवर हरवली.

आत्ता आत्ता तर बाप्पा आले, विराजमान झाले, पाठोपाठ गौराई माहेरी आल्या. सुखाचे चांदणे अंगणी शिंपून घर आंगण चैतन्य दायी करून सासरी गेल्या. पाठोपाठ बाप्पा ही सर्वांना निरोप देऊन गेले सुद्धा..! वातावरणातील ही प्रसन्नता मनाला टवटवीत करते.

आयुष्याच्या वाटेवर चालताना असे कितीतरी क्षण स्मृती पटलावर मागे टाकून आपण पुढे निघून जातो. पण तोच आनंद आठवणींच्या रूपाने दरवळत राहतो. असो..! तर त्या अश्या गर्दीत...

आणि हरवलेल्या त्या सावल्या त्या क्षणी, पहाटेच्या प्रहराला, शेवरीच्या डोहाच्या कडेला असलेल्या त्या वठलेल्या बाभळ आणि त्या लिंबाच्या झाडांवरील पक्षांचा तो चिवचिवाट अंथरुणात कानावर पडायचा. अन् शांत प्रसन्न वेळी त्या भल्या मोठ्या दगडी चौकटीत अडकलेले ते सागवानी दार करकर करत उघडल्याचा तो आवाज कानी पडायचा. दाराच्या आतून असलेली ती लोखंडी कडी हलत राहायची. अन् तिच्या त्या आवाजाने सकाळ झाली ते कळायचे. खर्रर..खर्रर.. करणारा खराटा अन् सोबतीला गोठ्यातल्या गुरांच्या घंटीचा तो खळखळ आवाज अन् सड्यातल्या मातीचा दरवळ अजून ही नकळत दरवळतो. अन् मनाच्या खोलवर डोहाच्या तळाशी जाऊन बसतो.

अशा किती स्मृती एखाद्या हळव्या क्षणी आनंदाचा वर्षाव करत राहतात. आजही आठवते ती सर काळाची आणि मातीची नवरा नवरी त्यावर लावलेलं चिंध्यातल सुंदर कापड, पौषातल्या त्या सकाळी शेकोटीच्या भोवती आणि तुझी सासू , पाटलाच्या घरा एवढा जाळ, हरवलेला तो चगळाचा कावळा, शाळेत जातांना पाठीवरची तंगसाची पिशवी आणि पोत्याची खोळं, गुरांमगे खेळता खेळता केलेला अभ्यास ती घाणेरीच्या झाडाच्या जाळीतली उडालेली चिमणी आजही आठवते. अंगणातील चुलत्या मालत्या सोबत चांदण्यात बसून केलेलं जेवण,

शेणानी सारवलेलं आंगण, त्यातच रात्री अंगणातल्या कॉटवर लोळता लोळता बापूंनी सांगितलेली तारकापुंजाविषयी माहिती, निसर्गात शिकण्याचा तो अनुभव सहावीतली ओले हिरवे दिवस कविता शिकताना पडलेला पाऊस नकळत शब्दसरीतून बरसतो.



सौ.वैशाली चंद्रकांत महाडिक
निनाम –सातारा

अंगणात खेळता खेळता रेडिओ वरच्या सायंकाळच्या बातम्या, रविवारी सव्वा सातला लागणारी लोकगीते, नभोनाट्य, सकाळच्या संस्कृत बातम्यात ए ...एम... आकाशवाणी ह: बलदेव नंद सागरहा इती वार्ता.... हा.. आणि रविवारी सकाळी नऊ वाजता निपचीत पडलेला अख्खाची अख्खा गाव आणि त्यात घुमलेली महा भारत.. असा पहाडी आवाज अगदी सहा सात घरापर्यंत पोहचेल असा.

म्हसोबाच्या माळ रानातल ते खोपीच घर, कुसवडेच्या रानातील बिबविच्या झाडाखाली केलेला फोडणीचा पावटे भात, भुईमुगाच्या वेलावरून खाललेल्या कोलांट्या उड्या ओढ्याच्या बारीक वाळूत केलेला पायाचा खोपा त्या ओढ्याच्या पाण्यात कसा.. कुठे.. केंव्हा वाहून गेला कळलेच नाही. चांगुण्या, कार, बोर, चिंचा, सीताफळ, वडाच्या त्या पारंब्या कुठे कशा.. नि कितीतरी आठवणी...!

डोंगर माथ्यावरून पाहिलेल्या माझ्या निनाम गावाचं ते लोभसवाणे रूप केंव्हा तरी आजही नजरेत उभे राहते. नागमोडी वळणे घेत जाणारी वाट तो जोतिबाच्या माळावरचा तो काळा डांबरी रोड अन् झाडा झुडपात लपलेली ती कौलारू माडीचे घरे, वाडे, मंदिरे, त्यासोबत गोठ्यातल्या गायी वासरे, सण, यात्रा, लग्नं, दिवाळीतल्या पहाटेच्या गारव्यातला सनईचा आवाज, उन्हाळ्यात अंगणात झोपल्यानंतर मध्यरात्री पाहिलेला, मागलदाराच्या बाभळी मागचा शीतल असा चंद्र या आणि अशा कितीतरी स्मृती.....,....प्रत्येक दिवसाच्या....

अंगणात लावलेलं ते रोपटे आणि त्या रोपट्या प्रमाणे दिवसागणिक वाढतच गेलेल्या त्या स्मृती आजही केव्हातरी हुंदडायला लावतात. ती उन्हे अन त्या सावल्या,.....अन् त्यांची अपूर्वाई

बाल वयातल्या त्या सावल्या, मनाला खूपचं भावल्या, लहानपणीच्या त्या स्मृती आजही स्मरतात. नि कधीतरी मनाला आनंद देऊन आठवणीत रमतात. जणू चंद्रसवैरा..! ..पण आजच्या सावल्यात त्या दूरवर पसरलेल्या सावल्या गर्दीत हरवल्याची खंत होऊन .. डोळ्यांच्या कडा ओल्या करून अश्रुंच्या रूपाने पुन्हा, पुन्हा धुसर होत जातात नि मग ....!!

व्याकुळणारी ही उन्हे
सावल्यात हरवताना
उमटवित जाती मागे
अस्तित्वाच्या पाऊल खुणा.

मनाचे नि उन्हाचे
कोवळे नाजूक नाते,
माहित नाही कुठल्या वळणावरी
जाऊन थबकते पुन्हा पुन्हा.

दूर ऊन सावल्याच्या
कवडाश्यात त्या हरवताना
मनाच्या गर्भगृहात समावूनी
खुणावतोय का तो कुणा?



# भगवान राईतकर यांच्या अनुभूति निरुपणचे प्रकाशन

## स्वामी हरिचैतन्य महाराज व आर.बी. मालपाणी गुरुजी यांच्या हस्ते प्रकाशन




**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**मेहकर** – ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक भगवान राईतकर यांच्या अनुभूति निरूपण या पुस्तकाचे प्रकाशन हिवरा आश्रम येथील विवेकानंद आश्रमाच्या व्यासपीठावरून झाले.

कर्मयोगी संत शुकदासजी महाराजश्री यांच्या समाधी मंदिर कलशारोहण सोहळा व मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये अनुभूति निरूपण या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. स्वामी हरिचैतन्य महाराज, त्यागमूर्ती आर.बी. मालपाणी गुरुजी, गजानन दादा शास्त्री महाराज, प्रकाश महाराज जवंजाळ, राष्ट्रीय कीर्तनकार शुकदास महाराज गाडेकर, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते श्यामभाऊ उमाळकर , विष्णुशास्त्री थुट्टे महाराज, सुप्रसिद्ध वक्ते संतोष गोरे, कवी रामदास राजेगावकर, डॉ. ज्ञानेश्वर गाडे, साहित्य संपादिका गीता राईतकर , कवयित्री पुष्पा पाटणकर यांच्या उपस्थितीत अनुभूति निरूपण या पुस्तकाचे प्रकाशन झाले. सोबतच साहित्य जगत या मासिकाचा कलशारोहण विशेषांक मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये प्रकाशित करण्यात आला. भगवान राईतकर यांच्या अनुभूति निरुपण या पुस्तकात कर्मयोगी संत शुकदासजी महाराजश्री यांच्या अनुभूति ग्रंथातील १३ अभंगावर निरूपण लिहिले आहे.

# धाडसी दिलीप रनभोर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

घटना सन १९८१ ची आहे. मी शासकीय सेवा सोडून पद्मश्री,मॅगसेसे अवार्ड सन्मानित डॉ.श्री.मनीभाईजी देसाई यांच्या भारतिय कृषी औद्योगीक प्रतिष्ठान उरळी कांचन जि.पुणे अंतर्गत गो पैदास केंद्र परांडा जिल्हा धाराशिव येथे कार्यरत होतो.

तो खिल्लार गो वंशाचा भाग होता. संकरित गो पैदासीला अति अल्प प्रतिसाद होता... त्यामुळे पशुपालक संपर्काच्या नव नविन संकल्पना मी राबवत होतो. ज्यामुळे गो संकरी करणास गती मिळेल. त्याच काळात माझे कृषी क्षेत्रातील व महिको कंपनीचे संशोधन अधिकारी मित्रवर्य श्री.संपतराव खिडसे यांची भेट झाली. ते शांत, सोज्वळ मित व मृदू भाषिक आहेत.

त्यांना अधिक उत्पादन देणाऱ्या ज्वारीचे फाऊंडेशन बियाणे उत्पादनाचे परंडा तालुक्यातील कांही भागात प्लॉट घ्यायचे होते.दैनंदिन कार्यात व्यस्त असतांनाच खिडसे यांची भेट झाली.

त्यांच्याशी गप्पा मारताना त्यांचा उद्देश समजला. ते

बियाणे साठवण्यासाठी माझ्या मदतीची अपेक्षा केली. मी माझ्या केंद्रात कमी काळासाठी संम्मती दिली... पण माझे वरिष्ठ अधिकारी व मार्गदर्शक अधिकारी श्री. विवेकभैय्या हतोळकर सर यांना कळवायचे विसरुनच गेलो होतो...

त्याप्रमाणे त्यांनी त्यांच्या बियाणाच्या बॅगा आमच्या केंद्रात ठेवल्या. व सर्वेक्षण करुन गांवनिहाय क्षमता योग्य शेतकर्याची निवड करुन ते बियाणे वाटपाचा कार्यक्रम नियोजित केला. पण महाबिज अकोला कार्यालयाच्या सुचने प्रमाणे तो कार्यक्रम रद्द झाला.व एका दिवसी बियाणे परत घेऊन जाण्या साठी एक टेम्पो सह श्री. खिडसे आले. ेम्पो लोडींग साठी १/२ व्यक्ती गरज होती. तेंव्हा माझ्या मंगळवार

## जुन्या आठवणी

**डॉ.श्याम वा.कुलकर्णी,पुणे.**
**मो.क्र-९८२३८०९६५६**

पेठेतील मेहनती व धाडसी तरुण व तत्कालीन आ.श्री.वासुदेव देशमुख याचे स्विय सहाय्यक श्री.दिलीप रनभोरची आठवण झाली. त्याच्या तीर्थरुपाचे अकाली निधन झाल्याने कोणतेही अवघड व कष्टाचे काम करत असे. त्या प्रमाणे तो मदतीस आला. त्याने एकट्याने टेम्पोत बियाणे लोड केले.

व ठरल्या प्रमाणे मित्रवर्य खिडसे अकोला येथे परतले. बियाणाला किडनाशक कार्बोफ्यूरॉन लावलेले असते. ते अत्यंत विषारी असते. पण आम्ही दिलीपला साबणाने हात-पाय स्वच्छ धुण्याच्या सूचना दिल्या होत्या....

शनिवार बाजार चा दिवस असल्याने व परिश्रम केल्याने दिलीप रनभोरला भूक लागली व त्याने अस्वच्छ हाताने बाजारातील केळ, काकडी खाल्या. हात स्वच्छ न केल्यामुळे दिलीप रनभोर बाजारात मूर्छीत होऊन पडला... व परांडयात गांवभर डॉ. कुलकर्णी यांनी दिलीपला विषारी पदार्थ खाऊ घातले....

त्यामुळे माझे अतिशय प्रामाणिक एकनिष्ठ मदतनीस श्री.बाबूराव शेळके (से.नि. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक) यांना दिलीप चा शोध घेण्यास सांगितले.व शोधा आंती डॉ.मुसा खाजगी डॉक्टरकडे जिवसंरक्षण व विषाचा उतारा करणारे औषधी व सलाईन दिले. वैद्यकीय फीस देऊन दिलीप ला त्याच्या घरी सोडले.व आमच्या मनाची अस्वस्थता दूर झाली.... सेवानिवृती नंतर यशस्वी जीवनाच्या कांही सुखद व दु:खद घटना स्मृती देतात... आठवणीत आहे तो विनम्र स्वभावाने काम करणारे धाडसी दिलीप रनभोर. सध्या तो. ३ टर्म परांडा नगरपालीकेचा व मंगळवार पेठेचा सन्मानीय नगरसेवक पद भुषवित आहे. व त्याचे दोन सुपूत्र बहूराष्ट्रिय कंपनीत इंजिनियर आहेत !

# उकडीचे मोदक : अचूक प्रमाणासह सोपी रेसिपी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

चतुर्थीच्या दिवशी बाप्पाच्या नैवेद्यासाठी उकडीचे मोदक हे हवेच. अनेक मिठायांच्या दुकानात तर मोदकांसाठी झुंबड पडते. असंख्य प्रकारचे मोदक मिळतातही, पण उकडीच्या मोदकाची, गरम गरम, पांढरेशुभ्र मोदक त्यावर साजूक तुपाची धार सोडून खाण्यात एक आगळेच स्वर्गसुखच असते. आपण हे सुंदर मोदक घरी सुद्धा बनवू शकतो .

गणपती बाप्पांच्या नैवेद्यासाठी त्यांच्या आवडीचे खास पांढरेशुभ्र मोदक आताआपण घरीच बनवूया. आणि भरपुर बनवुन मनसोक्त ताव मारुया. हे मोदक खाऊन बाप्पापण नक्कीच खुश होणार आणि भरभरून आशीर्वाद देणार. चला लागायचे मग तयारीला ?



**साहित्य : सारणासाठी..**

१ वाटी गच्च दाबून भरून मोठी वाटी नारळाचा चव, अर्धी वाटी बारीक केलेला गुळ, १ चमचा खसखस, १ चमचा वेलची पावडर १ चमचा साजूक तूप.

**पारी साठी साहित्य :**

१ वाटी बासमती तांदुळाची पिठी. १ चमचा मैदा, पाव वाटी वरून लावण्यासाठी तांदुळाची पिठी, चवीनुसार् पारीसाठी थोडेसे मिठ, ३..४ चमचे साजूक तूप, १ वाटी पाणी, केशरांच्या काड्या, वरून खाण्यासाठी साजूक तूप

**कृती :**

**सारण बनवण्याची :**

१ नारळ फोडून कुकर मध्ये १ शिट्टी देऊन कोमट झाला की सुरीने झटपट सुटतो. मग त्याची सालकाढण्याने साल काढून बारीक तुकडे करून मिक्सर मधून बारीक फिरवून घ्यावेत .

गॅसवर कढई ठेवून आधी खसखस थोडीशी भाजून घ्यावी व किंचित ठेचावी म्हणजे तिचा स्वाद खूप मस्त येतो . नंतर त्याच कढई मध्ये १ चमचा तूप घालून त्यात नारळाचा चव थोडासा ओलसरपणा जाईपर्यंत परतावा. तसे नारळाचे पण तेल असते पण ते सुटेपर्यंत परतायचे नाही शिवाय तुपामुळे सारणाला खुप् सुरेख स्वाद येतो . आता त्यात गुळ घालावा. मग वेलची पावडर घालावी. गुळ पूर्ण विरघळेपर्यंत व्यवस्थित परतावे आणि मग गॅस बंद करावा. सारण खूप ओलसरही नसावे आणि अगदी कोरडेही नसावे. चुकून जास्त कोरडे झाले तर चिंता न करता मिक्सर मधून थोडेसे फिरवावे म्हणजे मोकळे होईल आणीखूप मोकळे झाले असेल तर अगदी किंचित दूध घालावे. म्हणजे सारण ओलसर होईल. व मोदक छान लागतात.

आता हे सारण होऊ द्यावे. तोपर्यंत पारीची तयारी करू .

**पारीची कृती :**

गॅसवर एका जाड बुडाच्या भांड्यात १ वाटी पाणी उकळायला ठेवू. मग त्यात १ चमचा तूप घालून ते वितळले की चवीसाठी पाव ते अर्धा चमचा मिठ घालावे . नंतर त्यात १ वाटी तांदुळाची पिठी व न मैदा घालावा व लाकडाच्या दांड्याने किंवा लाटणे. रवी यांनी भराभर घोटून व्यवस्थित मिक्स करावे व लगेंच झाकण ठेवून गॅस बंद करावा. १० मिनिटे तसेच ठेवावे. त्यानंतर ते पसरट थाळी किंवा तसराळ्यात काढून घेऊन असेल तर पोळी भाजण्याच्या दाबण्याने काढावे .प्रत्येक मोदकावर एकेक केशराची काडी ठेवावी . अशाप्रकारे सर्व मोदक बनवून घ्यावेत . मग गॅसवर मोदकपात्र ठेवून त्यात पाणी उकळण्यास ठेवावे . मोदकपात्रातील जाळीच्या डिशमध्ये थोडेसे तूप लावून त्यावर सर्व मोदक ठेवावेत. पाणी छान उकळायला लागले की त्यात ही डिश ठेवून पंधरा मिनिटे दणकून वाफ द्यावी . आता मोदकांचा रंग छान वाफल्यामुळे




किंवा ग्लास, वाटी यांनी छान दाबून घोटावे. म्हणजे छान नरम होईल. मग ते चिकटू नये म्हणून १..२ चमचे तूप घालून लागेल तसे थोडेसे पाणी लावत भरपूर घोटावे. जेवढे जास्त मळले ..घोटले जाईल तेवढी पारी पातळ न तुटणारी, आणि तुपामुळे एकदम सॉफ्ट ..मुलायम होते . मग त्याचा एक छोटा गोळा करून पारीसारखा बनवून पहावा, तो चिकट न होता सॉफ्ट आणि चिरा न पडणारी पारी बनली तर ते परफेक्ट झाले असे समजावे. मग त्याचे टेनिसच्या बॉलपेक्षा थोडेसे छोटे बॉल्स बनवून ते पोळपाटावर थोडी तांदुळाची पिठी लावून छान पातळ पारी बनवावी . मैदा घातल्यामुळे पारी पातळ होते आणि तुटत सुद्धा नाही . आणि तुपामुळे चमकदार मोदक सुरेख दिसतात आणी स्वाद सुद्धा खूप मस्त येतो.

मग त्या पारीमध्ये थंड झालेले सारण भरपूर भरावे . मग साडीच्या निर्याप्रमाणे वरपासून जास्तीतजास्त खालीपर्यंत कळ्या पाडून वरती हलक्या हाताने सर्व टोके एकत्र करून व्यवस्थित बंद करून मस्त टोक चमकदार. पांढराशुभ्र झालेला असेल. वरच्या केशरकाड्यान्चा छान केशरी रंग टोकाला दिसत असेल . हे मोदक पात्रातून सर्व्हिंग डिश

मध्ये काढून गरम गरम मोदक थोडासा फोडून त्यावर भरपूर साजूक तूप घालून घावे . व गरगरमच खायला द्यावेत. गुळामुळे खूप मस्त खमंग गोडाची चव येते.

**वैशिष्टय:**

हे मोदक या पद्धतीने बनवले तर खात्रीने सुरेखच होतात . रंग, स्वाद. चव सर्वच उत्तम जमते. मिठामुळे पारीला छान चव येते . वेलची

पावडर, केशर, गुळ, तूप आणि खसखस यांच्या सुरेख संगमामुळे आणि एकदम पातळ. एकदम पांढरीशुभ्र किंचित नमकीन पारी यामुळे हा मोदक खाणे म्हणजे स्वर्गसुखच

गणपती बाप्पा तर नक्कीच खूप होणार.

या साहित्यात साधारण १० ते १२ मोदक बनतात.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559